“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL : nkgsbs@gmail.com**

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। यः क्रियावान् स पण्डितः ।।

मूल्य रु. ५

क्रमांक ३ वर्ष : ३९ ऑक्टोबर-डिसेंबर २०१७

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

# दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ आणि
# दि नॉथ कॅनरा जी. एस. बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी
## वार्षिक स्नेहसंमेलन - २०१७

## निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

प्रमुख पाहुणे : ब्रिगे. डॉ. राजीव गोपाळकृष्ण दिवेकर, डायरेक्टर सिम्बॉयसीस इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीस

स्थळ : डॉ. अंटोनिओ डिसिल्व्हा ट्रस्ट हॉल, कबुतरखाना, दादर

दिनांक : रविवार १९ नोव्हेंबर २०१७ सायं. ४.१५ वाजता

## कार्यक्रम

◇ स्वागत गीत

◇ संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे

◇ प्रमुख पाहुण्यांचे मनोगत

◇ विशेष सत्कार : डॉ. सदानंद विनायक नाडकर्णी
संघाचे सन्माननीय सभासद केल्याबद्दल (तपशील : पृष्ठ ५)

◇◇◇ मध्यंतर ◇◇◇

◇ विवाहाची सुवर्णजयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.

◇ एज्यु. सोसायटीतर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना डॉ. राजीव दिवेकर यांच्या हस्ते बक्षिसे.

स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही.
याची कृपया नोंद घ्यावी.

**मारुती वि. दळवी**
कार्याध्यक्ष – संघ

**देवदास अ. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष – एज्युकेशन सोसायटी

# संपादकीय

## स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे ब्रिगे. डॉ. राजीव दिवेकर

येत्या १९ नोव्हेंबर रोजी ज्ञातीचे वार्षिक स्नेहसंमेलन दादर येथे भरणार आहे. त्याची निमंत्रण पत्रिका समोरील पृष्ठावर छापलेलीच आहे. यंदाचे प्रमुख पाहुणे आहेत पुणे येथील सिम्बॉयसीस इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीस याचे डायरेक्टर ब्रिगे. डॉ. राजीव गोपाळकृष्ण दिवेकर. त्यांच्या कर्तबगारीचा हा संक्षिप्त आलेख.

ब्रिगे. दिवेकर हे मूळ कणसगिरी गांवच्या प्रतिष्ठित दिवेकर घराण्याचे वंशज. त्यांचे आजोबा रा. ब. राघवेन्द्र दिवेकर हे मुधोळ संस्थानचे दिवाण होते. वडील गोपाळकृष्ण दिवेकर हे कस्टम्स व सेन्ट्रल एक्साईजमधून डेप्युटी कलेक्टर या पदावरुन निवृत्त झाले होते. ते पण कर्तबगार होते त्यांच्या शताब्दीच्या प्रसंगी ब्रिगे. दिवेकर यांनी संघाला भरघोस देणगी दिली होती व वडिलासंबंधी मुखपत्रिकेसाठी एक खास लेख लिहिला होता.

ब्रिगे. दिवेकर यांनी ३४ वर्षे सेनादलात काम केले आहे. ते खडकवासला येथील नामांकित एन्. डी. ए. चे विद्यार्थी होते. कॉम्बॅट सपोर्ट आर्म्स या विषयांत प्रथम आल्याबद्दल त्यांना खास पदक मिळाले होते. सैन्यांत असतांना बी.ई. (सिव्हील) परीक्षाही उत्तीर्ण झाले व सर्वप्रथम आल्याबद्दल त्यांना सुवर्ण पदकही मिळाले. त्यामुळे उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये जाण्यासाठी त्यांची निवड करण्यांत आली. कारगील व लेह येथे १२ ते २२ हजार फुटावरील दुर्गम प्रदेशात दळणवळण ठेवण्याचे जोखमीचे काम त्यांनी केलेले आहे.

मर्दानी क्रीडामध्ये ते एक निष्णात खेळाडू आहेत. ते उत्कृष्ट पॅराट्रुपरही आहेत. रोवींगमध्ये राष्ट्रीय स्तरावरचा रौप्यपदकही त्यांना मिळाले आहे. कॉलेज ऑफ मिलीटरी इंजीनीयरींगमध्ये असतांना शिक्षणांतले सुवर्णपदक व सर्वोत्कृष्ट खेळाडू असे दुहेरी पुरस्कार मिळालेले ते एकमेव अधिकारी होत. पायदळासाठी लागणारे पूल, संरक्षक तटबंदी, सुरुंग निष्प्रभ करणे इत्यादी क्षेत्रांत ते तज्ज्ञ आहेत. युनायटेड नेशन्सतर्फे नेमलेल्या शांतता राखणाऱ्या पलटणींत सोमालिया व लेबेनॉन या दोन ठिकाणी त्यांची नियुक्ती करण्यांत आली होती. सोमालिया येथे रस्ते, जल वितरण, पूल इत्यादी सिव्हील कामाचे चीफ इंजीनियर म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत आली होती.

सेनादलात असतांनाच त्यांनी आपला शिक्षणाचा प्रवास चालूच ठेवला होता. बी. ई., एम्. एस्सी, एम्. बीए, एम्. फील इत्यादी अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केले. त्यामुळे सेनादलांतून शिक्षणक्षेत्रांत पदार्पण करणे त्यांना सुलभ झाले. २००९ साली सेनादलांतून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यावर ते वर नमूद केल्याप्रमाणे डायरेक्टर म्हणून रुजू झाले. शिकायची त्यांना एवढी हौस की ६१ वर्षी त्यांनी मॅनेजमेंटमधली पी. एच्. डी. प्राप्त केली.

स्नेहसंमेलनाच्या प्रसंगी एक भाग म्हणून ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येतात. त्यावेळी विद्यार्थी व त्यांचे पालक मोठया संख्येने उपस्थित असतात. ब्रिगे. दिवेकर याचे भाषण त्यांना नक्कीच मार्गदर्शकपर ठरेल.

द.ना.नाडकर्णी



संघाच्या प्रोत्साहनाने आणि ठाणे मंच आयोजित



## वधूवर परिचय मेळावा

दिनांक : रविवार २६ नोव्हेंबर २०१७

वेळ : सकाळी ९.३० ते १.००

स्थळ : तेंडुलकर मंगल कार्यालय, मोगल लेन, माहीम

नोंदणी शुल्क : रु. ३००

### विशेष सूचना

१. हा मेळावा फक्त गौ. सा. ब्राह्मण व सारस्वत उमेदवारांसाठी आहे.

२. पूर्व तयारीसाठी संबंधितांनी खालील पदाधिकाऱ्यांकडे १८ नोव्हेंबर पर्यंत आपला संपर्क नंबर देऊन नोंदणी करावी. या उपक्रमाला समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्यास हा मेळावा रद्द करण्यांत येईल व त्याप्रमाणें संबंधितानां संपर्क नंबरावर तसे कळविण्यांत येईल.

३. नोंदणी शुल्क आपल्या बँकेच्या खाते क्र. १८१६ नौपाडा - ठाणे या शाखेत भरण्याची सोय.

### संपर्क

| सुरेश पालेकर | मंजिरी कुलकर्णी | गिरीश रेगे |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९६६५०९८११७ | ९९२२१६८७२५ |

**Visit our website :** www.nkgsbmatrimony.com

## ठाणे मंचतर्फे एक दिवसाची सहल

दिनांक : रविवार ७ जानेवारी २०१८

प्रस्थान : माहीम, मुलुंड, ठाणे, जोगेश्वरी

आकार : रु. ७०० (आपल्या बँकेच्य नौपाडा शाखा, खाते १८१६ मध्ये भरण्याची सोय.)

स्थळ : अद्याप ठरलेले नाही इच्छुकांनी डिसेंबर महिन्यात संपर्क साधावा.

| सुरेश पालेकर | मंजिरी कुलकर्णी | विवेक कुलकर्णी |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९६६५०९८११७ | ९८२००४५१३४ |

# प्रकाशझोत

## सायन हॉस्पीटलचे माजी डीन डॉ. सदानंद नाडकर्णी हे संघाचे सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत

संघाच्या घटनेनुसार ज्यांचे कार्य कौतुकास्पद आहे व कुठल्याही क्षेत्रात ज्यांचे योगदान उल्लेखनीय आहे अशा व्यक्तीचा गौरव म्हणून संघाचे 'सन्माननीय सभासद' म्हणून स्वीकृत करण्याची तरतूद आहे. त्यानुसार ९ सप्टेंबर रोजी संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा भरली होती, त्यावेळी सायन हॉस्पीटलचे निवृत्त अधिष्ठाता (डीन) डॉ. सदानंद विनायक नाडकर्णी यांना त्यांच्या रुग्णसेवेंतील योगदानाबद्दल संघाचे 'सन्माननीय सभासद' म्हणून स्वीकृत करण्याचा ठराव एकमताने संमत झाला. पृष्ठ दोनवर नमूद केल्याप्रमाणे १९ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनांत त्यांचा जाहीर सत्कार करण्यात येईल.

डॉ. नाडकर्णी यांचा जन्म ३ मे १९३२ रोजी गांवदेवी येथे झाला. आपल्या संघाची स्थापना १९३५ साली झाली. तेव्हा त्यांचे वडील व्ही. टी. नाडकर्णी पहिल्या कार्यकारिणीचे सभासद होते. नंतर त्यांची पुण्यात बदली झाल्यामुळे डॉक्टरांचे संपूर्ण शिक्षण पुण्यांतच झाले. विद्यार्थीदशेत सांस्कृतिक क्षेत्रांत ते उत्साहाने भाग घेत. पी. डी. ए. या नाट्यव्यवसायाला वाहिलेल्या प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या संस्थेतून त्यांना राज्यस्तरावरील पारितोषिके मिळालेली आहेत. भारतीय नाट्यसमारंभात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्याचा त्यांना बहुमान मिळाला १९४९ साली वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी शनिवारवाड्यावरुन राष्ट्रगीत म्हणण्यासाठी त्यांचीच निवड करण्यांत आली होती.

१९६० साली सर्जरी विषयांत एम्.एस्.ची परीक्षा पहिल्याच प्रयत्नांत ते उत्तीर्ण झाले. त्यावेळी अशा प्रकारचे यश अप्रुप असे. त्यानंतर बारा वर्षे त्यांनी मणिपाल, मंगळूर आणि पणजी येथे काम (एक प्रकारची तपश्चर्या) केले. १९७३ साली सायन हॉस्पीटल (लोकमान्य टिळक मेडिकल कॉलेज) येथे ते सर्जरीचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून रुजू झाले. तेरा वर्षानंतर १९८६ त्यांची अधिष्ठाता (डीन) म्हणून निवड झाली व चार वर्षाहून अधिक काम या पदावर काम केले. १९७३ साली ते जेव्हा दाखल झाले तेव्हां रुग्णालय दारुण अवस्थेमध्ये होते. ज्या वॉर्डची क्षमता फक्त ७२ खाटांची होती तेथे जवळजवळ तीनशे रुग्ण दाटीदाटीने असायचे. त्यात त्यांनी पुष्कळ सुधारणा केल्या. सायनपासून ठाणे पनवेलपर्यंत एकही रुग्णालय नव्हते. साधी रुग्णवाहिका नव्हती पण सर्वांची तात्काळ उपचाराची सोय असली पाहिजे अशी अपेक्षा होती. डॉ. नाडकर्णी यांनी हे आव्हान स्वीकारले. त्यांनी 'तात्काळ' वॉर्ड स्थापन केला. त्याला संलग्न लॅब व एक्स रे मशीन

बसवून घेतले. बसच्या सांगाड्यातून स्वत: रुग्णवाहिका बनविली. मध्ये शस्त्रक्रिया टेबल, वर दिवे, पाण्याची टाकी, विविध शस्त्रक्रिया करण्यासाठी तयार सेट्स, श्वासकरिता नळी, रक्तस्त्राव थांबविणे, त्याकरिता गुंगीची व्यवस्था करणे अशी सुसज्ज रुग्णवाहिका त्यांनी बनविली. अपघाताचा फोन आला की निवासी डॉक्टर व नर्स गाडी घेऊन जात व तेथूनच उपचार करीत रुग्णाला वॉर्डात आणत असत. जणू हॉस्पीटलंच अपघात स्थळी जात असे. इथेही पाच मिनीटात एक्स रे होई. आवश्यक तपासण्याचे रिपोर्ट अर्ध्या तासात मिळत व उपचार तर एक मिनीटात सुरु होत. जनता खूष. १९७७ साली किंग्स सर्कल जवळील गांधी मार्केटच्या मागे एका महाप्रचंड रेल्वे अपघातात अनेक जण अक्षरश: चिरडले गेले. अनेक जखमी, अनेक हाडे तुटलेली, डोकी फुटलेली, डॉक्टरांचा वॉर्ड कामाला लागला ८१ रुग्णांना आणले त्यांतील ६ वाटेतच दगावले. सर्व तज्ज्ञ आले रक्त पेढीने हांक देताच ४०० बाटल्या रक्त गोळा झाले. रात्रभर शस्त्रक्रिया चालू होत्या. डॉक्टर स्वत: जातीने सगळे ठीक आहे याची दक्षता घेत होते. फक्त ६ रुग्ण मृत्युमुखी पडले व बाकीचे बचावले. दुसऱ्या दिवशी सर्व वृत्तपत्रांतून पहिल्या पानावर आठ कलमी मथळे 'टिळक रुग्णालयांत अभूतपूर्ण रुग्णसेवा' स्तुतीच्या वर्षावांनी त्यांचा वॉर्ड प्रसिद्ध झाला. कमीत कमी वेळांत प्रशिक्षित मनुष्यबळ वापरुन आपण कितीतरी साध्य करु शकतो हे त्यांनी सिद्ध करुन दाखविले.

भाजलेल्या रुग्णाकरितांसुद्धा स्वतंत्र वॉर्ड स्थापन केला. अधिष्ठाता झाल्यावर अशा तात्काळ कक्षाला त्यांनी बळकटी आणली. विखुरलेले सर्व कक्ष पुढच्याच इमारतीत एकत्र आणले व त्यांमुळे उपचारांमध्ये सुसुत्रता आणण्यांत आली.

बाहेरुन आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांचे फार हाल असतात. अशा नातेवाईकांकरिता त्यांनी महावीर ट्रस्टच्या साहाय्याने एक धर्मशाळा उभारली. अशा प्रकारची ही पहिलीच धर्मशाळा असावी. त्यांनी १९८८ साली सौरऊर्जेचा वापर केला. कामगारांच्या जुन्या झालेल्या तेरा इमारती दुरुस्त केल्या पण स्वत:च्या फ्लॅटला चुन्याचा फटकाही मारुन घेतला नाही. त्यांच्या निरीच्छ वृत्तीमुळे त्यांना कामगारांकडूनही प्रचंड पाठिंबा मिळाला.

आपल्या अनुभवाचा उपयोग इतरांना व्हावा म्हणून त्यांनी तीन पुस्तकेही लिहिली. Management of Sick Healthcare System, माझे प्रिस्क्रीप्शन व व्यक्ती आणि समाज.

### संजय गायतोंडे हा महिला क्रिकेटपटू पूनम राऊत हिचा मार्गदर्शक

दोन महिन्यापूर्वी इंग्लंडमध्ये महिलांसाठी विश्वचषक क्रिकेट स्पर्धा भरविण्यांत आली होती. त्यांत भारतीय महिलांनी उत्कृष्ट खेळ करुन अंतिम फेरींत प्रवेश मिळविला होता. त्यावेळी पूनम राऊत या खेळाडूचे नांव प्रसारमाध्यमांमध्ये झळकत होते. सचिन तेंडूलकर यांचे आद्यगुरु जसे

रमाकांत आचरेकर त्याप्रमाणे पूनम राऊत हिचा मार्गदर्शक म्हणजे संजय गजानन गायतोंडे, हिंदू हायस्कूलमधील लोकप्रिय शिक्षक डी. एस्. गायतोंडे यांचा नातू.

बोरीवली येथील एका मैदानावर पूनम क्रिकेट खेळत होती तेव्हां सजयने तिला खेळतांना प्रथम पाहिलं. तेव्हा ती केवळ दहा वर्षाची होती. तिच्या खेळाची शैली बघून संजय प्रभावित झाला आणि त्यांने पूनमला प्रशिक्षण देण्याचे ठरविले. पूनम सध्या २७ वर्षाची आहे तरी ती रोज संजयच्या हाताखाली निदान दोन तास तरी सराव करते. स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असा एकेक पल्ला ती गाठत गेली. विश्वचषकांतील तिच्या कामगिरीमुळे आज तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे त्याचे बरेचसे श्रेय संजयकडे जाते.

संजय हा मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या बी. के.सी येथील अकेडमीत फलंदाजीचा प्रशिक्षक म्हणून पूर्णवेळ काम करतो. सकाळच्या प्रहरांत रणजी ट्रॉफीपर्यंत पोचलेले वरिष्ठ खेळाडू त्याच्या हाताखाली सराव करतात. रोहित शर्मा, अजिंक्य राहणे सारख्या कसोटीवीरांनाही संजयने मार्ग दर्शन केले आहे. दुपारच्या सत्रांत तो उदयोन्मुख खेळाडूंना फलंदाजीचा कोच म्हणून आपल्या ज्ञानाचा उपयोग करुन देतो. कांगा लीगच्या स्पर्धेतील कांही टीम्सचाही तो कोच म्हणून काम करतो. यंदा कांगा लीगच्या ‘अ’ गटांत पार्कोफीन ही टीम सर्वांत अधिक गुण मिळवून विजेती झाली. त्या टीमचा बॅटींग कोच संजयच होता.

## आपल्या बँकेच्या शताब्दीच्या गौरवगाथेच्या प्रकाशनाच्या प्रसंगी सहसंपादक म्हणून द. ना. नाडकर्णी यांचा सत्कार

आपली बँक २६ सप्टेंबर १९१७ रोजी स्थापन झाली. त्यामुळे २०१६-१७ हे वर्ष शताब्दी म्हणून बँकेने साजरे केले. वर्षभर मुंबई, पुणे, फोंडा, कारवार, कोल्हापूर, बंगळूर, हुबळी इत्यादी ठिकाणी ग्राहकांचे व हितचिंतकांचे मेळावे भरविण्यांत आले व त्यांना दर्जेदार मनोरंजनाची मेजवानीही देण्यांत आली. शताब्दी महोत्सवाचा एक भाग म्हणून बँकेच्या शंभर वर्षाच्या इतिहासाचे पुस्तक ‘गौरवगाथा’ या नांवाने छापण्याचे ठरविले. बँकेचे चेअरमन श्री. किशोर कुलकर्णी यांनी हे पुस्तक लिहिण्याची जबाबदारी मुखपत्रिकेचे संपादक द. ना. नाडकर्णी, बँकेच्या गेल्या पन्नास वर्षाच्या जडणघडणीचे साक्षीदार अलका दिवाडकर व सहकारी चळवळीचे त्यासंगी अभ्यासक अजित रेगे यांच्यावर सोपवली. २३ सप्टेंबर २०१७ रोजी शताब्दी सोहळ्याचा सांगता समारंभ प्रमुख पाहुणे श्री. पी. बी. आचार्य, राज्यपाल, नागालॅंड व अरुणाचल प्रदेश यांच्या उपस्थितींत पार पडला. समारंभाच्या दरम्यान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले व त्यांच्यातर्फे संपादकमंडळांतील तिघांचाही स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यांत आला. या पुस्तकांत अत्यंत

दुर्मीळ माहिती, छायाचित्रे व अभ्यासू लेख आहेत पुस्तकाची छपाईही उत्कृष्ट व आकर्षक आहे. इच्छुकांनी बँकेच्या जवळच्या शाखेतून पुस्तक उपलब्ध करुन घ्यावे.

**निहाल सबनीस याला पूरग्रस्त विभागात**
**अतुलनीय कामगिरी केल्याबद्दल प्रशस्तीपत्र**

आपल्या संघाचे माजी उपाध्यक्ष कै. महादेव सबनीस यांचा नातू व माहीम येथील श्री. प्रदीप सबनीस यांचा मुलगा निहाल हा नौदलाच्या हवाई विभागात विशाखापट्टम येथे फ्लाईट कमांडर या पदावर काम करतो. नौदलाच्या अॅकेडमीचा कोर्स उत्तम रीतीने उत्तीर्ण झाल्यानंतर त्याची आय्. एन्. एस मैसूर व दिल्ली या फ्लॅगशीपवर नियुक्ती झाली होती. नंतर नौदलाच्या हवाई विभागांत त्याची निवड झाली. ऑगस्ट २००४ मध्ये आय्. एन्. एस्. कारवार ही बोट समुद्रात बेपत्ता झाली होती व तिचा जमिनीशी संपर्क तुटला होता निहालवर या बोटीचा शोध घेण्याची जबाबदारी देण्यांत आली. त्याच्या 'चेतक' या हेलीकॉप्टरच्या उड्डाणाच्या आवाक्या बाहेरील ही मोहीम होती, तरी निहालते मोठ्या चिकाटीने, कौशल्याने व प्रसंगावधान राखून, रडार यंत्रणेच्या साहाय्याशिवाय प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत त्या बोटीचा शोध घेण्यांत यश मिळविले. त्याच्या या कौतुकास्पद कामगिरीची दखल घेऊन नौदलप्रमुखाकडून त्याला खास प्रशस्तीपत्रक देण्यांत आले.

अलीकडेच जुलै २०१७ मध्ये ओरीसामध्ये काही भागात पावसामुळे प्रलय झाला व अनेक भागांना बेटांचे स्वरुप आले होते व त्यांचा दळणवळणाचा मार्ग तुटला होता. अडकलेले लोक अन्नाशिवाय व्याकूळ झाले होते. त्यावेळी त्यांना अन्नाची पाकिटे पुरविण्याची कामगिरी निहालवर सोपविली होती. त्याने नागरी विभागाशी संपर्क साधून अत्यंत धोक्याच्या परिस्थितींत जीवाची पर्वा न करता खाण्याची पाकिटे आपदग्रस्तांच्या दारात पोचविण्याचे धाडसी काम केले व अनेकांचे प्राण वाचविले. निहालच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल त्याच्या कॅप्टनने नौदप्रमुखाकडे निहालला पुरस्कार देण्यासाठी शिफारस पत्र पाठविले आहे.

**प्लॅस्टिक व कॉस्मेटीक सर्जरीतले तज्ज्ञ डॉ. पराग तेलंग याची यशोगाथा**

फलटण येथे पूर्वी प्रसुतीगृह चालविणारे व सध्या पुण्यात स्थायिक झालेले डॉ. शशांक व डॉ. पल्लवी तेलंग यांचा सुपुत्र डॉ. पराग तेलंग पूर्वी महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सतर्फे घेतलेल्या एम्.सी.एच् या पदव्युत्तर परीक्षेंत उभ्या महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला होता. पराग याचा सुपर स्पॅशेलिटीचा विषय आहे 'प्लॅस्टिक अँड रिकन्स्ट्रक्शन सर्जरी'. रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्स, इंग्लंड यांनी परागला एम्.आर. सी. एस् (मेम्बर ऑफ रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्स) ही प्रतिष्ठेची पदवी देऊन त्याला गौरविले आहे. २०१० साली त्याला फ्रांस व बेल्जियममध्ये

कॉस्मेटीक सर्जरी विषयात अनुभव घेण्यासाठी शिष्यवृत्ती मिळाली होती. परागने काही वर्षे सायन हॉस्पिटलमध्ये प्लॅस्टिक सर्जरीच्या विभागात अध्यापनही केले आहे.

सध्या त्याने अंधेरी लोखंडवाला येथे स्वत:चे 'डिझायनर बॉडीज' हे प्लॅस्टिक सर्जरी संबंधित अद्ययावत हॉस्पिटल सुरु केले आहे. लठ्ठपणा घालविण्याच्या सर्जरीशिवाय बाह्य कर्णाचे सुस्थापन करण्यात त्याचा हातखंडा आहे. आतापर्यंत त्यांने दोनशेहून अधिक शस्त्रारोपण केले आहेत. बेजींग येथे झालेल्या या विषयावरील परिषदेत त्याचा सहभाग होता व तेथे त्याने दोन प्रबंध सादर केले व तेथील तज्ज्ञानी त्याचे कौतुक केले. त्याच्या नवीन उपक्रमाला शुभेच्छा.

**वैद्य शैलेश नाडकर्णी यांना यंदाचा वैद्यराज दातार स्मृती पुरस्कार**

सांगली येथे वैद्यराज दातार पंचभौतिक चिकित्सा व संशोधन केन्द्र ही आयुर्वेदाच्या प्रसाराला वाहिलेली एक नामांकित संस्था आहे. या संस्थेतर्फे प्रतिवर्षी आयुर्वेदातील लक्षणीय योगदानाबद्दल पुरस्कार देण्यांत येतो. मानपत्र व ११००१ रुपयाचे पारितोषिक असे या पुरस्काराचे स्वरुप असते. २०१७ सालचा हा पुरस्कार वैद्य शैलेश दामोदर नाडकर्णी यांना प्रदान करण्यांत आला आहे. मानपत्रांत नमूद केल्याप्रमाणे वैद्य नाडकर्णी हे आयुर्वेदांतील एक अग्रगण्य तज्ज्ञ आहेत. अध्यापन, संशोधन, प्रमाणीकरण यांत त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. कायाचिकित्सा, रोगनिदान आणि रसशास्त्र या क्षेत्रांत त्यांची कामगिरी भरीव आहे. घूतपापेश्वर या सर्वांत प्राचीन औषधनिर्मितीच्या कंपनीत ते सल्लागार म्हणून काम करतात. ऑल इंडिया आयुर्वेद काँग्रेसच्या संशोधन व विकास या विभागाचे ते उपाध्यक्ष आहेत. तसेच शीव येथील आयुर्विद्या प्रसारक मंडळीच्या व्यवस्थापन समितीचे ते अध्यक्ष आहेत. आयुर्वेदांतील विद्यार्थ्यांनाच नव्हे तर अध्यापकांनाही ते सतत मार्गदर्शक म्हणून काम करतात. त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यांत येत आहे असा मानपत्रांत उल्लेख आहे.

२०१५ साली आपल्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करुन त्यांचा सत्कार करण्यात आला होता. त्यावेळी मुखपत्रिकेत त्यांचा परिचय करुन दिला होता.

**एलिसे वागळे अमेरिकेत १४ वर्षाच्या वयोगटाच्या टेनीस स्पर्धेत अजिंक्य**

८५ वर्षाचे डॉ. दिनकर गणपत वागळे हे मूळचे अस्नोटी गांवचे. माटुंगा येथील यु.डी.सी.टी. मधून केमीकल इंजीनीयरींगची पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी इंग्लंडमधील बर्मिंगहॅम विद्यापीठांतून पदव्यूत्तर पदवी घेतली. कॅनडा येथील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या मैक्गील विद्यापीठांत त्यांना अध्यापनाची संधी मिळाली. तेथेच त्यांनी पी. एच्. डी. ची पदवीही मिळवली. नंतर ड्यु पॉंट या रसायन निर्मितीच्या अग्रेसर कंपनीत त्यांनी काम केले. त्यानंतर इंटरनॅशनल पेपर

कंपनीत त्यांनी काम केले. त्यांच्या नांवाने तब्बल बारा पेटंट्स आहेत यावरुन त्यांच्या उच्च दर्जाच्या संशोधनाचा आवाका समजतो.

पुराभिलेखांत प्राचीन संस्कृतीचा व स्थलांतराचा विशेषत: भारताचा प्राचीन इतिहासाचा अभ्यास करणे हा त्यांचा मुलखावेगळा छंद आहे. आस्ट्रेलियांतील आदिवासींच्या स्थलांतराबद्दल त्यांनी विशेष संशोधन केले आहे. तेथील आदीमानव सुमारे ४५ हजार वर्षापूर्वी दक्षिण भारतांतून स्थायिक झाले असे त्यांनी पुराव्यानिशी प्रथमच सिद्ध करुन दाखविले. याविषयांवर त्यांची अनेक पुस्तके व शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

डॉ. वागळे यांची नात इलीसे हिला नुकतीच १४ वर्षे पूर्ण झाली आहेत. ती टेनीस खेळण्यांत वाकबगार आहे. गेल्या वर्षी अमेरीकन टेनीसच्या १४ वर्षाच्या खालील मुलींसाठी ठेवलेल्या स्पर्धेत ती अजिंक्य होती. सध्या १५ वर्षाच्या वयोगटांत ती अमेरिकेत क्ले कोर्ट चॅम्पियन आहे. टेनीस हेच करीयर करण्यासाठी ती आता व्यावसायिक (प्रोफेशनल) गटात सामील झाली आहे.

**कु. पंकजा पिंगे सी. ए. इंटरमीजिएट परीक्षेत ४४ व्या क्रमांकाने उत्तीर्ण**

पारले येथे राहणारे आपल्या बँकेचे संचालक श्री. नागेश दिनकर पिंगे यांची केवळ १८ वर्षाची कन्या कु. पंकजा पिंगे ही एच्. आर. कॉमर्स कॉलेजची विद्यार्थिनी. ती अलीकडेच सी.ए च्या इंटरमीजिएट परीक्षेंत भारतांतून गुणवत्ता यादीत ४४ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तिला सर्व विषयांत ६० टक्क्याहून अधिक गुण मिळाले आहेत. ती अद्याप १४ वीतच आहे व बीकॉमही पूर्ण केलेले नाही. एवढ्या लहान वयात मिळालेले तिचे यश कौतुकास्पद आहे. ती केपीएम्जी या प्रख्यात कंपनीत आर्टिकल्स करते. श्री. पिंगे स्वत: सीए आहेत व त्यांची मोठी कन्या कु. निकीता ही सुद्धा सीए असून सिंगापूर येथे जॉन्सन अँड जॉन्सन या बहुराष्ट्रीय कंपनीत कामाला आहे.

**नियोजित संस्कृत पाठांतर स्पर्धा यंदा अल्पप्रतिसादामुळे रहित**
**पर्यायी स्पर्धा सुचविण्याबद्दल आवाहन**

संघातर्फे १९७९ पासून प्रतिवर्षी ज्ञातीतील विद्यार्थ्यांना एकत्र आणण्यासाठी व्यासपीठ म्हणून संस्कृत पाठांतर स्पर्धा भविण्यांत येत असे. इंग्रजी माध्यमामुळे दिवसेंदिवस स्पर्धकांची संख्या रोडवत गेली. यंदातर प्रतिसाद एवढा अत्यल्प होत ती नाईलाजाने रहित करावी लागली. तरीही संघाच्या कार्यकारिणीचा मनोदय आहे विद्यार्थ्यांसाठी पर्यायी चित्रकला, हस्ताक्षर, वक्तृत्व स्पर्धा भरविण्यांत याव्या. या संबंधात कुठल्याही हितचिंतकाला पर्याय सुचत असल्यास त्यांनी कार्याध्यक्षांशी संपर्क साधावा.

**मारुती विश्वनाथ दळवी, कार्याध्यक्ष**
**(९९६९८२९५०५)**

# ‘गुजरा हुआ जमाना’ एक आगळा अनुभव

ठाणे मंच व मुंबई मंच यांनी एकत्रित येऊन केलेला, ‘गुजरा हुआ जमाना’ हा दृक – श्राव्य (Audio-Visual) कार्यक्रम म्हणजे एक आगळा वेगळा अनुभव! १० सप्टेंबर रविवार रोजी संध्याकाळी माहीमच्या तेंडुलकर सभागृहात हा हिंदी सिनेसंगीतावर आधारीत कार्यक्रम संपन्न झाला.

आपल्या संघाचे सन्माननीय सभासद श्री. अरुण कसबेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. श्री. कसबेकर यांनीच हा कार्यक्रम करण्यासाठी ठाणे मंच व मुंबई मंचच्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहित केले. व विशेष म्हणजे दुसरा महत्वाचा कार्यक्रम असूनही त्यांनी आम्हाला आधी कबूल केल्याप्रमाणे या कार्यक्रमाला हजेरीही लावली.

१९५० ते १९७० हा कालावधी म्हणजे हिंदी सिनेसंगीतातील सुवर्ण काळ मानला जातो. एकापेक्षा एक सरस असे गीतकार, संगीतकार, गायक व गायिका तसेच त्यांच्या सुमधुर अशा गाण्यांना उत्कटपणे पडद्यावर साकार करणाऱ्या अतिशय देखण्या अशा नायिका व युगल (द्वंद्व) गीतात त्यांना तितक्याच उत्कटतेने साथ देणारे नायक! खरंच हजारो गीतांतून २५–२६ गाणी निवडताना संभ्रमीत व्हायला झाले. मृणाल दळवी, अर्चना वागळे व चित्रा कामत यांची गाणी निवडताना मला खूप मोलाची मदत झाली.

श्री. विवेक पुणतांबेकर हे जुन्या हिंदी सिने संगीताचे शौकीन, दर्दी व अभ्यासक आहेत. त्यांच्या बरोबर हा कार्यक्रम सादर करायला त्यांचे बंधू श्री. विश्वास पुणतांबेकर व साऊंड सिस्टीम सांभाळणारे श्री. सतीश केळकर आले होते. श्री. सतीश केळकर नावाजलेले साऊंड रेकॉर्डीस्ट आहेत. या सर्वांनी स्क्रीन, साऊंड सिस्टीम याची जबाबदारी लीलया पेलली गाणी आम्ही निवडली तरी प्रत्येक गाण्याची पार्श्वभूमी, अभिनेता, अभिनेत्रींचे त्यावेळी गाजलेले किस्से सांगुन कार्यक्रम अगदी रंगतदार केला.

मध्यंतरात चहा व बटाटे वड्यांचा आस्वाद घेतल्यावर प्रेक्षक पुन्हा एकदा जुन्या जमान्यात हरवून गेले. या कार्यक्रमाला उपस्थिती कमी असली तरी आलेला प्रेक्षक सुजाण, दर्दी होता व त्यांनी मनापासून गाण्यांचा आनंद घेतला, व उत्स्फूर्तपणे दादही दिली. एक दर्जेदार कार्यक्रम बघितल्याचे समाधान मिळाले.

ठाणे–मुलुंड वरुन ठाणे मंचचे लोक बसने आले होतेच शिवाय बोरीवली, डोंबिवली, गिरगाव, चर्चगेटवरुन ही रसिक आले होते.

ठाणे मंच काय किंवा मुंबई मंच काय किंवा दोघांचे एकत्रित कार्यक्रम नेहमीच दर्जेदार होतात. तेंडुलकर हॉल मुंबईतील मध्यवर्ती सभागृह आहे. तरीही जवळपास राहण्याऱ्यांची अनुपस्थिती जाणवली. खरंतर पावसाने ही त्या दिवशी दडी मारली होती. एक बहारदार कार्यक्रम Miss केला. इतकेच म्हणावेसे वाटते.

पावसाने दिली साथ, प्रेक्षकांनी फिरवली पाठ? कारवारकरा, तुला आमच्यावर भरोसा नाय काय? नाय काय?

**मंजिरी कुलकर्णी**




SIP in Mutual Funds will help you to save regularly & discipline manner,
To achieve your goal..

| Monthly Investment required for target of Rs.1 Crore | | | |
|---|---|---|---|
| No. of Years | CAGR Returns | | |
| | 12% | 15% | 18% |
| 10 | Rs. 43,471/- | Rs. 36,335/- | Rs. 29,739/- |
| 15 | Rs. 20,017/- | Rs. 14,959/- | Rs. 10,879/- |
| 20 | Rs. 10,109/- | Rs. 6,679/- | Rs. 4,267/- |
| 25 | Rs. 5,322/- | Rs. 3,083/- | Rs. 1,717/- |

## Mangsidesh Investments Pvt Ltd.

Head Office : 402, Business Point Bldg, Behind Brahma Kumari Hosp., Andheri (West)
Tel No. 022 - 4233 2323/ 6584 1233/ 6523 8964
Branch Office : A/53, Shanti Shopping Centre, Next to ICICI ATM, MiraRoad 401 107
Tel No. +91 91672 20380 / 022 - 2855 2111/ 2812 7555
1/11, Kappeesh Tower, M.G. Road, Mulund (West), Mumbai 400 080
Tel No. + 91672 20379/ 022 - 6500 1366

Mutual Fund Investments are subject to market risks, Read all schemes related documents carefully.

# एक शापित हिरा निखळला



रविवार दिनांक ३० जुलै २०१७ रोजी सकाळी ६.३० वाजता, माझे वडील श्री. भास्कर दत्तात्रय कसबेकर यांच्या मामी ती. हिरा विश्वनाथ पालेकर यांचे देहावसान झाल्याचे ऐकून मन अगदी सुन्न झाले व भूतकाळात गेले.

कारवारात हिंदु हायस्कूलमध्ये असताना मी व माझा भाऊ जयंत नियमित तोडूरला जात असोत. हिरामामी आणि विश्वनाथमामा आम्हा दोघांचे भरपूर लाड करत. दोघांनाही आम्ही नेहमी अगदी हसतमुख चेहऱ्याने वावरताना बघायचो. अजुनही त्यांची आठवण आली तर दोघांचे फक्त हसतमुख चेहरेच डोळ्यासमोर उभे राहतात. हिरामामी गोऱ्यापान, देखण्या आणि त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीच वात्सल्य ओसंडून वाहत असे. विश्वनाथमामा दुर्दैवाने अपस्मार व्याधीने ग्रस्त झाले होते. कधी त्यांना एक दिवसाआड तर कधी अनेकवेळा लागोपाठ फिट्सचे झटके येत. त्यांचे डोळे जरा निरखून पाहिले तर असे वाटायचे एक प्रखर बुद्धीमान माणूस केवळ या व्याधीने अगदी पोखरुन निघाला आहे.

हिरामामी दिवसरात्र अगदी सावली सारखी त्यांची काळजी घेत होती. फक्त शरीराचीच नव्हे तर खास करुन मामांच्या मनाची सुद्धा. सर्वस्वी तिच्यावर अवलंबून असून सुद्धा तिने एकदाही मामांचा उल्लेख नाराजीने देखील केला नाही. अतिशय विनयाने आणि आदराने ती मामांशी वागत असे. मामांच्या या असहायतेमुळे त्यांना नोकरीधंदा करणे शक्यच नव्हते. स्वत:च्या बंधूंनी केलेल्या आर्थिक मदतीवरच त्यांचा चरितार्थ चालत असे.

समस्त पालेकर कुटुंबीयांची तोडूरमध्ये शेतीची मशागत ते लागवड, पेरणी ते कापणी पर्यंत संपूर्ण देखरेख तसेच वडिलोपार्जित प्रशस्त घर, विस्तीर्ण बागायत फक्त विश्वनाथमामा आणि हिरामामींमुळेच सुरक्षित आणि सुस्थितीत राहिली. नाहीतर ते केव्हाच बळकावले गेले असते व त्याचे नमोनिशाणही राहिले नसते. कुठल्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा न करता खास करून हिरामामीने या वास्तुंचे रक्षण केवळ कर्तव्य बुद्धीनेच पार पाडले. याला काही मोल नाही. शांतपणे विचार केल्यास सहज पटते की, स्वकीयांनी त्यांना वेळोवेळी केलेली मदत सुद्धा त्या मानाने कमीच होती. तरीपण हिरामामी व मामा सदैव या मदतीबाबत कायमचे स्वकीयांचे ऋणी राहिले. स्वत: घेतलेल्या कष्टांचा आणि मेहनतीचा त्यांनी कधी उल्लेख सुद्धा केला नाही.

इथे मी माझा एक अनुभव सांगू इच्छितो. ३० मे १९६४ रोजी माझा विवाह झाला व जून महिन्यांत आम्ही, कुलदेवी श्री. शांतादुर्गेच्या दर्शनाला गोव्याला आलो. गोव्याहून

कारवारला जाताना माझ्या पत्नीच्या आग्रहामुळे तिचे आजोळ श्री. विश्वंभर अंबादास वर्टी यांचे प्रशस्त घर व सभोवतालची अलिशान बागायत बघायला 'बाड'ला गेलो. माझ्या पत्नीचे शालेय शिक्षण 'बाड'लाच झाले होते. पण बरेच फिरून सुद्धा तिला स्वत:च्या आजोबांचे घरच सापडले नाही. घराच्या आणि बागायतीच्या जागी एक भकास मैदान होते. जवळ राहणाऱ्या श्री. विष्णूभट पावर्शेकडे चौकशी करता असे सांगण्यात आले की सबंध घरच नव्हे तर घराच्या पायाचे चिऱ्याचे दगड सुद्धा नाहीसे झाले होते. हा सर्व प्रकार जेमतेम दोन वर्षातच झाला होता. केवळ वर्टी कुटुंबाने दुर्लक्ष केल्यामुळे! माझी पत्नी तर तिथेच जमिनीवर फतकल मारून ओक्साबोक्शी रडू लागली. आमच्या हनिमूनला लागलेले हे एकमेव गालबोट! स्थावर वास्तुकडे दुर्लक्ष केल्यास काय परिणाम होतो याचे हे एक ज्वलंत उदाहरण आहे.

कोणालाही, तसेच स्वत:च्या नशीबालाही दोष न देता त्या सुस्वभावी हिरामामीने आपले हे दैवलिखीत भोग/ प्राक्तन स्वीकार केले होते व त्याची इतरांना जाणीव सुद्धा होऊ दिली नाही. केवळ मानाने आणि हिमतीने तिने सर्व संकटांचा हसतमुखाने सामना केला. आपल्या एकुलत्या एक मुलाचे निधन तसेच आवडत्या तरुण नातवाच्या अपघाती मृत्यूने खचून न जाता आपल्या प्राक्तनाचाच हा एक भाग आहे असे समजून विरक्त वृत्तीने हा दैवाघात फक्त हिरामामीच सहन करू शकल्या. स्वत:च्या निधनाची वेळसुद्धा (रविवार सकाळ ६.३० वाजता) अशी निवडली की आप्तेष्टांना पुढील विधी अगदी विनासायास, शांततेने कुठल्याही प्रकारच्या गैरसोयीशिवाय पूर्ण करता आले.

मी हिरामामींना कधीही कोणाबद्दल वाईट बोललेले किंवा दोष दिलेला ऐकले नाही. मी एकदा मामींना सहज म्हटले की तू मूळची कसबेकर घराण्याची असल्यामुळेच या सर्व संकटांचा सामना करू शकलीस. मामींनी ताबडतोब मला सडेतोड उत्तर दिले की, माझी चुकीची समजूत आहे. ती ठामपणे म्हणाली – "मी नशीबवान आहे म्हणूनच मला हे थोर पालेकर घराणं लाभलं. इतकेच नव्हे तर माझी अशी मनोमन इच्छा आहे की, जन्मोजन्मी मला हेच घराणं व हाच पती लाभो." तुम्हीच सांगा या साध्वींसमोर मी आता काय बोलणार ?

आणखीन एक महत्त्वाचा पैलू या साध्वीबद्दल जर सांगावयाचा असेल तर ती विश्वनाथमामा वारले तेव्हा तोडूरच्या गावकऱ्यांच्या आग्रहानुसार मृत देहाला सचैल आंघोळ घालण्यात आली आणि ते आंघोळ घातलेले पाणी जमा करुन त्याच पाण्याने हिरामामींना स्नान घालण्यात आले. मामींची नंतर जेव्हा भेट झाली तेव्हा मी त्यांना म्हणालो की, तुम्ही अशा हिडीस प्रकाराला कशा तयार झाल्यात ? तर त्या म्हणतात – जर तसे करण्याने गावकऱ्यांचे समाधान होत असेल तर त्यात वावगे काय आहे ? शिवाय माझ्या नवऱ्याचे शरीर स्पर्श झालेले पाणी माझ्या दृष्टीने पवित्रजल आहे.

अशा ह्या पुण्यात्म्याला माझे त्रिवार नमन.

आता सर्व स्वकीयांनी एकत्र येऊन तोडूरमधील पालेकर-वास्तूचे जतन करणे आवश्यक आहे. तसेच घराण्याच्या परंपरेनुसार १) भूदेवीच्या देवळात दर सोमवारी पूजेकरिता- अर्धा किलो तांदूळ, १ नारळ, फुले, कापूर, उदबत्ती वगैरेंची व्यवस्था २) मे महिन्यात भरणारी जत्रा (भांड) तेथे देवीला ५ नारळांची ओटी, ३) धिंड उत्सव - गोविंद आणि महादेव देवळात पालेकर कुटुंबीयांतर्फे पूजा तसेच ४) बीरदेव कट्टा येथे २५ नारळांची आहुती वगैरे वगैरे, घराण्याच्या हिताकरिता करणे आवश्यक आहे, जे इतकी वर्षे हिरामामी भक्तीभावाने करत होती.

वास्तूचे जतन तसेच वरील सर्व पूजाअर्चा करण्याची कायमची आर्थिक सोय जर स्वकीयांनी केली तर तीच एक हिरामामी, विश्वनाथमामा, देविदासमामा तसेच इतर पालेकर पुण्यात्म्यांना स्वकीयांकडून मिळालेली श्रद्धांजली ठरेल.

माझ्या मते हिरामामींच्या आत्म्याला सद्‌गती मिळो, शांती लाभो असे म्हणण्यात काहीच अर्थ नाही. अशा पुण्यात्म्याचे आपले दैवत श्रीमंगेश शांतादुर्गा स्वत:च स्वागत करतील व म्हणतील -

ये पोरी! आयुष्यात तू खूपच कष्ट, त्रास आणि यातना आनंदाने भोगलेल्या आहेत. तू खूप थकलेली असशील! आता आमच्याजवळच रहा!


**अरुण भास्कर कसबेकर**
**९८२०२९१३६५**

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| अनिकेत अनिल कसबेकर, अंधेरी | व | अपर्णा रामचंद्र वागळे, सांताक्रुज |
| शीतल रवींद्रनाथ कसबेकर, माहीम | व | ऋषी गौतम बावडेकर, दादर |
| रोहन नरेंद्र कुलकर्णी, वांद्रे | व | अदिती अजित कुलकर्णी, मुलुंड |
| अनिरुद्ध भारत फेणे, पारले | व | रसिका अशोक जोशी, पारले |
| मंदार मधुकर तेलंग, केरवडी | व | सरिता विष्णु कामत, शिमोगा |

www.kccgoa.in

कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद



अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

**मंगेशाच्या देवळापासून २ मिनिटांच्या अंतरावर,**
**मंगेशी, फोंडा- गोवा**

**प्रॉजेक्ट मान्यताः** गोवा टाउन प्लॅनिंग
**कर्जसहाय्यः** नामवंत वित्त संस्था



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

**फ्लॅटस् उपलब्धः १ रुम किचन, १ बी.एच्.के, २ बी.एच्.के**

a Project by:
**कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी**

**मुंबई ऑफिसः** श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला,
सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलिः**2683 3841/47/ 72.** मोबाः **98336 36451**
फॅक्सः 2683 3872 ई-मेलः kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिसः टी- १, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबाः 98209 33352, 98206 33321

गोवा साईटः 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

saadadvertising.com

# माझी आई पुष्पा तेलंग हिची सत्तरी

पुष्पा ही बोरकरांच्या घरातील पहिली लेक,
सगळ्या भावंडांची केली तिने छान देख - रेख।।
संसाराची हिला फार आवड,
घरकामातून मिळत नसे हिला सवड।।
बोरकरांची लेक दिली तेलंगांच्या घरी,
तिथे सुशांता बनून ही काम खूप करी।।
सासऱ्यांची सेवा हिने केली मनापासून,
शिवानंदाची भार्या सुशांता होऊन।।
नवऱ्याची हिने सदा दिली साथ,
सगळ्या अडचणींवर हिने केली मात।।
उमा आणि दिनेश ही मुले हिची गुणी,
दृष्ट नको लावायला हिच्या संसाराला कुणी।।
जावई आणि सून हिचे समीर आणि विद्या,
म्हणून हिला नाही कोणतीच चिंता सध्या।।
अतिप्रिय नातू दोन अवधूत आणि आदित,
ही असते सदा स्वामींच्या छायेत।।
देवावर हिचा विश्वास फार,
म्हणून हिने कधीच मानली नाही हार।।
संपूर्ण कुंटुंबासाठी ही नेहमी करते प्रार्थना,
म्हणून पूर्ण होतात आम्हा सर्वांच्या कामना।।
आज हिला पूर्ण होत आहेत वर्षे सत्तर,
आयुष्य हिचे जणू काही आहे अत्तर।।

(प्रायोजित) सौ. समिधा समीर पंडित



**(24/02/1954 - 19/08/2017)**

**Mrs. Shaila Shankar Desai Aged 63**

Peacefully expired on 19/08/2017
Deeply Mourned by
Shankar (Husband) and Sameer (Son)

1) Bhaskar, Sudha, Maya & Sekhar
2) Suresh & Veena
3) Mrudula, Rakhee & Rohit
4) Meena, Uday & Salil
5) Sanjay, Shaila, Kushal & Prathamesh

माझी पत्नी सौ. शैला शंकर देसाई ही माहेरची शैला महाबळेश्वर गायतोंडे राहणार जोगेश्वरी. १९७८ ला लग्न झाल्यावर ती प्रथम सायनला आमच्या घरी आली. मी आजोळी रहात असे. माझी आजी, आजोबा, मामा, मामी व दोन मुले असे आमचे एकत्र कुटुंब होते. बिल्डिंगचे मालक श्री. वागळे यांच्या कुटुंबासह सर्वांशी ती नेहमीच मिळून मिसळून वागत असे. माझ्या दोन बहिणी व भाऊ यांच्याशीही ती नेहमीच प्रेमाने वागत असे.

१९८३ पासून आम्ही भांडूपला राहायला गेलो. ती कोणाशी बोलताना जात पात धर्म यांचा विचार करत नसे. ती अगदी साधी होती. एवढ्या वर्षात तिने एकदाही नवीन दागिना केला नव्हता की साड्या घेतल्या नव्हत्या. कारवार आणि मंगेशी सोडल्यास ती कधी मुंबईबाहेर फिरायलाही गेली नाही. निरनिराळे पदार्थ करुन घरच्यांना आग्रहाने बोलावून खायला घालणे तिला फार आवडे. ती उत्तम जेवण करत असे आणि त्यामुळे हॉटेलमध्ये आम्ही फार कमी वेळा जात असू. माझे मामा, मामी बहीण भाऊ यांची ती लाडकी होती. ती वाद घालणे टाळत असे आणि वाद घालणाऱ्या लेकांपासून चार हात दूर रहाणे पसंत करीत असे. ती घर अगदी लख्ख ठेवीत असे.

२०१४ ला तिला प्रथम गर्भाशयाचा कॅंसर झाला. त्यावर २५ रेडीअेशन ऑपरेशननंतर देऊन ती पूर्ण बरी झाली. २०१६ ला लंग कॅन्सर झाला. त्यावर १८ केमोथेरपी देण्यात आल्या. नंतर त्या परिणाम करेनाशा झाल्या व दि. १९ ऑगस्टला भांडूपला आपल्या राहत्या घरीच ती दिवंगत झाली. शनिवारी दुपारी ११/२ वाजता. शुक्रवारपर्यंत ती घरात हिडत फिरत होती आणि कधीही अंथरुणाला खिळून नव्हती ही परमेश्वराची कृपा.

**(प्रायोजित)** **श्री. शंकर दत्तात्रय देसाई, भांडूप**

## निधन

| | | |
|---|---|---|
| परशुराम (राम) वैकुंठ भेंडे | (पैगिणी/सदाशिवगड) | पारले |
| रमा अनंत देसाई | (बेटकुळी) | बोरीवली |
| शैला शंकर देसाई | (बेटकुळी) | भांडुप |
| सिंधू नारायण कसबेकर | (खारगे) | गिरगांव |
| अविनाश (अवि) सदानंद कुलकर्णी | (हळगे) | मीरा रोड |
| * उषा त्रिंबक फेणे | (चेंडिये) | गोरेगांव |
| सुरेश विश्वेश्वर नाडकर्णी | (मल्लापूर) | पुणे |
| आशा काशिनाथ पालेकर | (कडवाड) | अंधेरी |
| सुरेखा (पद्मिनी) भालचंद्र पालेकर | (तोडूर) | कफ परेड |
| हिरा विश्वनाथ पालेकर | (तोडूर) | पुणे |
| सीताबाई (चंपा) राजाराम पावशे | (बाड) | बाड |
| हीरा दुलबा तेलंग | (केरवडी) | कारवार |
| दिगंबर भवानी तेलंग | (केरवडी) | कुर्ला |
| सुनिती (तारा) यशवंत तेलंग | (हारवाडे) | पुणे |
| मीरा विश्वनाथ तेलंग | (हारवाडे) | जोगेश्वरी |
| सरला मंगेश वाघ | (सदाशिवगड) | सदाशिवगड |
| विठ्ठल सदानंद वागळे | (बाड) | तळेगांव |
| उषा जयवंत वागळे | (हाणकोण) | मालाड |
| बाळकृष्ण मंगेश यार्दी | (सुपा) | पुणे |

* उषा फेणे यांनी देहदान केलेले आहे.


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

### श्री. चैतन्य नाडकर्णी यांजकडून एज्युकेशन सोसायटीला कृतज्ञतापूर्वक सहा लाख रुपयांची देणगी

कै. शांताराम विश्वेश्वर नाडकर्णी हे गेल्या पिढीतील एक इंजिनीयर होते. शिक्षणासाठी त्यांना एज्युकेशन सोसायटीकडून आर्थिक साहाय्य झाले होते. त्यांचे सुमारे पंधरा वर्षापूर्वी निधन झाले. त्यांच्या पत्नी श्रीमती मुक्ता यांचे फ्रेब्रुवारी २०१६ साली निधन झाले. त्यांची एज्युकेशन सोसायटीला कृतज्ञतेच्या भावनेतून देणगी द्यायची इच्छा होती. ही इच्छा त्यांचे एक जवळचे नातेवाईक पुण्याचे श्री. चैतन्य सदानंद नाडकर्णी यांनी स्वेच्छेने पूर्ण केली. त्यांनी श्रीमती मुक्ता व श्री. शांताराम विश्वेश्वर नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला सहा लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### श्री. गिरीश देसाई यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ समाजसेवानिधीसाठी १,११,१११ रुपयांची देणगी

सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे बालपण गेलेले श्री. गिरीश महाबळेश्वर देसाई यांचे नुकतेच १६ जुलै रोजी दु:खद निधन झाले, त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या पत्नी श्रीमती गौरी देसाई यांनी समाजसेवानिधीसाठी १,११,१११ रुपयांची देणगी दिली आहे.

श्री. देसाई यांचा जन्म १५ सप्टेंबर १९४३ रोजी झाला होता. त्यांचे शिक्षण अरविंद गंडभीर हायस्कूल येथे झाले होते. हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याती होती. व्यवसायाने ते सिव्हील इंजीनीयर होते. किलीक निक्सन, हेस्ट फर्मासुटीकल, महिन्द्र अँड महिन्द्र इत्यादी नामांकित कंपनीत त्यांनी काम केले आहे. सामाजिक कार्यांतही त्यांचे बरेच योगदान आहे. गोरेगांव येथील 'प्रबोधन' या सांस्कृतिक संस्थेच्या कारभारी मंडळाचे ते सक्रिय सभासद होते. मागे सहार विमानतळाचे भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी बाजपायी यांच्या हस्ते 'छत्रपती शिवाजी महाराज' यांच्या नावे नामकरण करण्यात आले होते. त्यानंतर तेथे १९ फेब्रुवारी २००४ रोजी पंतप्रधानाच्या हस्ते छत्रपतीच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. चौथरा बांधून पुतळा उभारण्याचा संकल्प विक्रमी वेळात पूर्ण केला म्हणून गिरीश यांचे पंतप्रधानातर्फे सत्कार करण्यांत आला. शिवाजीपार्क येथील जलतरण तलावाच्या नूतनीकरणांत ते जातीने लक्ष पुरवीत. अरविंद गंडभीर शाळा चालविणाऱ्या जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारीमंडळावरही त्यांनी काही वर्षे सभासद म्हणून काम केले होते. अडचणीच्या वेळी त्यांच्या नेत्यांशी असलेल्या प्रचंड संपर्कामुळे शाळेला त्यांच्यामुळे साहाय्य मिळालेले आहे.

कुटुंबवत्सल स्वभाव, हसतमुख चेहरा, कुणालाही कठीण प्रसंगी मदत करण्याची प्रवृत्ती यामुळे ते सर्वत्र लोकप्रिय होते.

## श्री. अरुण कसबेकर यांच्यातर्फे वृद्धसेवानिधीसाठी आणखी एक लाख रुपयांची देणगी

तोडूर, कारवार येथे राहणारे ती. विश्वनाथ गणपत पालेकर यांचे १९८४ साली निधन झाले तर त्यांच्या पत्नी ती. हिरा यांचे अलीकडेच ३० जुलै रोजी देहावसान झाले. उभयतांनी आपल्या संपूर्ण जीवनांत बिकट परिस्थितींतही सर्वांचे नेहमी भलेच चिंतीले, कोणाचाही द्वेष वा हेवा केला नाही. फक्त निष्काम सेवाच केली अशा पुण्यात्म्यांच्या स्मरणार्थ ती विश्वनाथमामांच्या भगिनी कावाका यांचे नातू श्री. अरुण भास्कर कसबेकर व सौ. मंगला (प्रभा) यांनी वृद्धसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. हिरामामी संबंधीचा एक लेख 'एक शापित तारा निखळला' याच अंकात अन्यत्र दिला आहे. श्री. कसबेकर यांची गेल्या अकरा वर्षांतील ही विसावी देणगी आहे आणि त्यांची दिलेल्या देणग्यांची एकूण रक्कम ३३ लाख ५० हजार रुपयांहून अधिक आहे.

## श्रीमती सुमन वागळे यांजकडून यंदाही संघाला पन्नास हजार रुपयांची देणगी

पुणे येथील श्री. रुद्रा रामचंद्र वागळे यांचे आठ वर्षापूर्वी निधन झाले त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती सुमन वागळे प्रतिवर्षी पुण्यतिथीच्या प्रसंगी संघाला पन्नास हजार रुपयांची देणगी देतात. यंदाही त्यांनी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## श्री. वासुदेव कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ वृद्धसेवानिधीसाठी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे कै. वासुदेव नारायण कुलकर्णी आपल्या ज्ञातिसंबंधित घटनांमध्ये विशेष रस घेत असत. त्यांनी संघाला दोन वेळा एकेक लाख रुपयांच्या देणग्या दिल्या होत्या. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांच्या इच्छेनुसार संघाला तीन वेळा पन्नास हजार रुपयांच्या देणग्या दिल्या होत्या. यंदाही संघाला त्यांनी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## अनंत गायतोंडे याजकडून एज्युकेशन सोसायटीला कृतज्ञतापूर्वक पन्नास हजार रुपयांची देणगी

मूळ काणकोण गांवचे श्री. बाळकृष्ण मोहन गायतोंडे गेली कित्येक वर्षापासून शिरसी येथे स्थायिक झाले आहेत त्यांची मुलगी सवित्री व मुलगा अनंत यांनी शिक्षणासाठी आपल्या एज्युकेशन सोसायटीकडून आर्थिक साहाय्य घेतले होते. सावित्रीचा विवाह झाला आहे व अनंतलाही आता चांगली नोकरी मिळाली आहे. अनंत याने अलीकडेच एज्युकेशन सोसायटीला कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी म्हणून पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | ७५ व्या वाढदिवसा निमित्त श्री. विनायक महाबळेश्वर तेलंग यांजकडून | १०,००० |
| २. | श्री. बाळकृष्ण (मिलींद) शिवकुमार नाडकर्णी यांच्याकडून | २०,००० |
| ३. | श्रीमती इंदिरा व श्री. शंकर सदाशिव वागळे यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. किशोर यांजकडून. | १,००१ |
| ४. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८६ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १५०० |
| ५. | अनामिकेकडून | १,००१ |
| ६. | श्रीमती नीशा व केदार पालेकर यांची कन्या रीमा ही सी. एस. उत्तीर्ण झाल्याबद्दल सविता सबनीस फाउंडेशन कडून | ५,००१ |
| ७. | श्रीमती गोदावरी व श्री. नारायण रामराव नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ सविता सबनीस फाउंडेशन कडून. | ५,००१ |
| ८. | पितृपक्षानिमित्त पितरांच्या स्मरणार्थ अनामिकेकडून | २००१ |
| ९. | श्री. श्रीकांत परमानंद वागळे यांच्या वाढदिवसानिमित्त पुत्र श्री. प्रथमेश यांजकडून | १,५०० |
| १०. | पितृ पक्षानिमित्त पितरांच्या स्मरणार्थ श्री देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | १,००१ |
| ११. | श्री.गिरीश महाबळेश्वर देसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती गौरी यांजकडून | १,११,१११ |
| १२. | श्री. देवीदास पांडुरंग बोरकर यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ | |
| | पत्नी श्रीमती शैला यांजकडून | ५,००० |
| | कन्या कु. सुनीता यांजकडून | ५,००० |
| १३. | पितृपक्षानिमित्त पितरांच्या स्मरणार्थ श्रीमती रेखा चंद्रशेखर धुमे यांजकडून | १,००० |
| १४. | श्री. रुद्रा रामचंद्र वागळे यांच्या आठव्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती सुमन यांजकडून. | ५०,००० |

## वृध्दसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | ५०,००० |
| २. | श्री. मधुकर काशिनाथ नाडकर्णी यांच्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती शालन यांजकडून. | १,००१ |
| ३. | श्री. जगदीश दिगंबर वाघ यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी व १ ल्या पुण्यतिथी निमित्त भाचा श्री. मांगिरीश प्रमोद कसबेकर व भाचेसून श्रीमती उमा व नातू कुमार, जय यांजकडून | १०,००० |
| ४. | श्रीमती इंदिरा मंगेश नाडकर्णी यांच्या पुण्यतिथी निमित्त स्नुषा श्रीमती वंदना प्रमोद नाडकर्णी यांजकडून. | ५,००० |
| ५. | विवाहाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त श्रीमती नीता व डॉ. श्रीकांत शांताराम वागळे यांजकडून. | ५,००० |

६. कुमारी मंजुषा किशोर बोरकर यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त वडील श्री. किशोर दत्तात्रय बोरकर यांजकडून. १०,०००
७. पितृपक्षा निमित्त पितरांच्या स्मरणार्थ श्री.देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून ११,००१
८. पितृपक्षा निमित्त पितरांच्या स्मरणार्थ भांडारकर कुटुंबीयांकडून २,५०१
९. श्रीमती मीरा व श्री. गोपाल सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र सर्वश्री मिलींद व निमीष यांजकडून. ५,००१
१०. श्रीमती हिरा व श्री. विश्वनाथ गणपत पालेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ श्री. अरुण भास्कर कसबेकर यांजकडून. १,००,०००
११. श्री. रामदास काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्री. सिंधू यांजकडून. १५०१

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

१. डॉ. मनोहर दत्तात्रय वर्दे यांच्या पुण्यतिथी निमित्त स्नुषा श्रीमती शिल्पा सुधीर वर्दे यांजकडून. २,०००
२. श्रीमती स्नेहलता गोविंद कसबेकर यांच्या २ ऱ्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून. ३,०००
३. श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. पराग यांजकडून. २०,०००
४. श्रीमती. मोहना व डॉ. दिगंबर भालचंद्र देसाई यांच्या स्मरणार्थ कन्या डॉ. पल्लवी शशांक तेलंग यांजकडून. १०,०००

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

१. श्री. अनंत बाळकृष्ण गायतोंडे यांजकडून कृतज्ञतापूर्वक ५०,०००
२. श्रीमती कमल विश्वंभर गायतोंडे यांच्या ११ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधु श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून १०,०००
३. श्रीमती मुक्ता व श्री. शांताराम विश्वेश्वर नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ श्री. चैतन्य सदानंद नाडकर्णी यांजकडून. ६,००,०००
४. श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८६ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. १,५००
५. श्री. विलास मोंडकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. वरद यांजकडून ५,०००
६. कुमारी वेला उल्हास भट यांजकडून कृतज्ञतापूर्वक २५,०००
७. श्री. नारायण गोविंद बोरकर यांच्या स्मरणार्थ पुतण्या श्री. मिलींद दिनकर बोरकर यांजकडून. १,००१
८. पितृपक्षानिमित्त पितरांच्या स्मरणार्थ अनामिकेकडून. २,००१

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80






हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.